# 🔊 महत्त्वाची सूचना 🔊

## शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया (वर्ष २०२६-२७)

(जा.क्र.ससंइमाबककको/शा.व./वेळापत्रक/२०२६-२७/१५१८ दि.:- ०७/०८/२०२६. पत्रास अनुसरून)

**इतर मागास वर्ग (OBC), विमुक्त जाती (VJ), भटक्या जमाती (NT) आणि विशेष मागास प्रवर्ग (SBC)** मधील उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, कंदलगांव (कोल्हापूर) येथील शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी शासनाच्या **mahait.org** या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन दिलेल्या मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावा.

## 📅 प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक (१२वी नंतरचे अभ्यासक्रम):

- 📝 **ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी:** ७ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६
- 🔍 **अर्जांची छाननी:** १ सप्टेंबर २०२६ ते ७ सप्टेंबर २०२६
- 📊 **पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणे:** ८ सप्टेंबर २०२६
- 📥 **पहिल्या यादीनुसार प्रवेश घेण्याची मुदत:** १८ सप्टेंबर २०२६
- ⌛ **दुसरी प्रतीक्षा यादी प्रसिद्ध होणे:** २१ सप्टेंबर २०२६
- 🏁 **दुसऱ्या यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत:** ३० सप्टेंबर २०२६

## 📌 महत्त्वाची माहिती व संपर्क:

- अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जातील.
- अधिक माहितीसाठी विद्यार्थी **'सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण (तिसरा मजला), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, बाबर हॉस्पिटल जवळ, कोल्हापूर'** या कार्यालयाशी संपर्क साधू शकतात.

⚠️ **टिप:** विहित मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत आपले अर्ज सादर करावेत.

दिनांक: २१/०८/२०२६

SHIVAJI UNIVERSITY School of Engineering & Technology, Kolhapur.

Director
School of Engineering & Technology,
Shivaji University, Kolhapur

महाराष्ट्र शासन

**सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर.**

**E-mail:-adobckolhapur@gmail.com**

जा.क्र.ससंइमाबकको/शा.व./वेळापत्रक/२०२६-२७/ ९५१८ दि.:- ०७/०८/२०२६.

**प्रति,**

**प्राचार्य,**
**महानगरपालिका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये,**
**जि.कोल्हापूर.**

**विषय :- इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वसतिगृहातील प्रवेशाचे वेळापत्रकाच्या प्रचार प्रसिध्दीबाबत..**

**संदर्भ :-** मा.संचालक,इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.४४४५ दि.०५.०८.२०२६

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृह कंदलगांव, कोल्हापूर या वसतिगृहांमध्ये प्रवेश अर्ज करणेसाठी आपल्या महाविद्यालयातील नोटीस बोर्डवर याबाबतची सुचना देण्यात याव्यात. तसेच सोशल मिडीयाव्दारे (WhatsApp, SMS) याबाबतची माहिती प्रसारीत करून विद्यार्थ्यांमध्ये प्रचार प्रसिध्दी करावी. याबाबत आपण व्यक्तीश: लक्ष घालावे, जेणेकरुन इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी या योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. , ही विनंती

**सोबत :- प्रवेशाचे वेळापत्रक व वसतिगृह प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती**

(सुनिता नेर्लीकर)
**सहायक संचालक,**
**इतर मागास बहुजन कल्याण,कोल्हापूर.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

मा.प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग (प्रादेशिक) विभाग,पुणे.

## राज्यातील इतर मागासवर्ग,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेसाठी वेळापत्रक

राज्यातील इतर मागास वर्ग,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी https://hmasnew.mahait.org या शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर प्रवेश अर्ज मागविण्याबाबत वेळापत्रक देण्यात आले आहे.

**शासकीय वसतीगृह योजनेसाठी व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सन २० २६-२७ या शैक्षणिक वर्षासाठीचे प्रवेशाचे वेळापत्रक**

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी | अर्ज छाननी करावयाचा कालावधी | पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे | पहिली निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी प्रसिध्द करणे | दुसऱ्या निवड यादीमधील विद्यार्थ्यांना प्रवेशांची अंतिम मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या नविन प्रवेशितांकरिता **व्यावसायिक व अव्यावसायिक** अभ्यासक्रमासाठी | दिनांक ०७.०८.२०२६ ते ३१.०८.२०२६ | दिनांक ०१.०९.२०२६ ते ०७.०९.२०२६ | दिनांक ०८.०९.२०२६ | दिनांक १८.०९.२०२६ | दिनांक २१.०९.२०२६ | दिनांक ३०.०९.२०२६ |

### पुढीलप्रमाणे प्रवर्गनिहाय रिक्त जागांवर वसतिगृहात प्रवेश उपलब्ध

| अ.क्र. | जिल्हा | वसतीगृह प्रवेश क्षमता | प्रवर्ग | आरक्षण | मुलांचे वसतिगृह | | मुलींचे वसतिगृह | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | व्यावसायिक | अव्यावसायिक | व्यावसायिक | अव्यावसायिक |
| | | | | | रिक्त संख्या | रिक्त संख्या | रिक्त संख्या | रिक्त संख्या |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| १ | कोल्हापूर | १०० | इमाव | ५१ | २ | ९ | ६ | ९ |
| | | | विजाभज | ३३ | ३ | ३ | ५ | ४ |
| | | | विमाप्र | ६ | ० | १ | २ | २ |
| | | | दिव्यांग | ४ | ३ | ० | ३ | १ |
| | | | अनाथ | २ | १ | १ | १ | १ |
| | | | आर्थिक मागास प्रवर्ग | ४ | १ | ० | ० | १ |
| | | **एकूण** | | **१००** | **१०** | **१४** | **१७** | **१८** |

तरी वरील वेळापत्रकानुसार या योजनेसाठी पात्र असणाऱ्या इतर मागासवर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील नमूद कालावधीत https://hmasnew.mahait.org शासनाच्या या संकेतस्थळावर अर्ज भरावेत. तसेच अधिक माहितीसाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण (तिसरा मजला) कोल्हापूर. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन विचारे माळ,बाबर हॉस्पीटल जवळ,कोल्हापूर या कार्यालयाशी संपर्क साधावा.

Sneila

सुनिता नेर्लीकर

**सहायक संचालक,**

**इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर.**